# प्रतिवाद



## चूलवाला माणूस...

'आरती'चे अध्यक्ष आर. डी. हणबर-देशमुख पुण्यात शिक्षण घेत होते. सुटीत ते गावी चाफळ येथे आले होते. आई स्वयंपाक करत असताना धूर झाल्यामुळे 'चुलीचा धूर कमी कर, घरात बसता येत नाही' असे आईला म्हणाले. यावर आई म्हणाली, 'तुला पुण्याला शिक्षण दिले. चुलीचा धूर कमी करायला मला सांगतो, मग तुझ्या शिक्षणाचा काय उपयोग. चुलीचा धूर तूच कमी कर ना...' हीच प्रतिक्रिया त्यांच्या कामाची दिशा बनली आणि लाखोंसाठी क्रांतिकारी ठरली. परिणामी जगभरात त्यांची ओळख 'चूलवाला' म्हणून झाली आणि आजही ती कायम आहे. 'सीएसई मीडिया फेलोशिप' अंतर्गत लेखन आणि संशोधन करत असताना हा 'चूलवाला माणूस' आढळून आला. एका चुलीमुळे एवढे मोठे महाभारत घडेल आणि ती आपली जागतिक पातळीवरची ओळख ठरेल, असे आर. डीं.ना स्वप्नातही वाटले नव्हते, मात्र ते घडले. या कामी त्यांचे गुरु कोण ठरले, तर ते चुलीवर स्वयंपाक करणारी गृहिणी आणि चुली तयार करणारे 'कुंभार'. चुलीसाठी माती कोणती असावी, काय मिसळावे आणि शेणाऐवजी गाढव-घोड्याची लीद का, याची माहिती पुस्तकातून नव्हे तर कुंभारांकडूनच मिळाली. म्हणूनच तर आर. डी. नेहमी म्हणतात, 'कोणताही सामाजिक उपक्रम ग्रामीण भागात राबवायचा असेल तर तुम्ही 'सुधारित चूल' उपक्रम हाती घ्या, कारण प्रत्येक घरात जाता येते.' 'आरती'च्या माध्यमातून 'आर. डी.'नी ग्रामीण भागात पारंपरिक चूल आणि इंधनाला पर्याय देणारी नवी यंत्रणा उभी केली. चूल तयार करणारे उद्योजक तयार केले. लक्ष्मी, पार्वती, भाग्यलक्ष्मी, गृहलक्ष्मी, भारत लक्ष्मी, विवेक या चुली तर सराई स्वयंपाक प्रणाली, संपदा गॅसिफायर चूल त्याचबरोबर गृहलक्ष्मी ५०, लक्ष्मी १५०, खवा, चपाती या मोठ्या आकाराच्या चुलीही त्यांच्याच प्रेरणेतून तयार झाल्या. त्यांनी तयार केलेल्या चुलीमुळे महाराष्ट्राच्या अनेक भागात इंधनबचत तर झालीच त्याचबरोबर स्वयंपाक घरातील धुराचा त्रास कमी झाला. ग्रामीण भागात जगण्याशी थेट संबंधित प्रश्नांवर उत्तर शोधण्याचे काम आर. डीं.नी केले आणि त्यात त्यांना यशही आले. महाराष्ट्रात रोज दोन कोटींहून अधिक चुली पेटतात आणि प्रत्येक चुलीला पाच किलो लाकडे धरली तर रोज दहा कोटी किलो लाकडे जाळली जातात. भारतात दरवर्षी चुलीतून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे पाच लाखांहून अधिक महिला आणि बालके मृत्युमुखी पडत असल्याचे जागतिक आरोग्य संघटना सांगते. मग 'आर. डी.'चे काम मोलाचे ठरते कारण ७० टक्के ऊर्जा स्वयंपाकासाठी वापरली जात असल्याचे त्यांनी लक्षात घेतले आणि आपल्या सामाजिक कार्यासाठी 'चूल'च निवडली, हे ही नसे थोडके.

**- मोहन मस्कर-पाटील**